d:\recruitment 2016-17\bharati 2016 letters.docx

# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय

" वनवर्धन ", प्रधान डाक घरासमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३.

☎ कार्यालय-०२३१/२६५३६३२, निवास-२६५३६३४, फॅक्स-२६५९२३३ E-mail-ccftkolhapur@gmail.com

---

**विषय :-वनरक्षक भरती प्रक्रिया २०१६**
**उमेदवारांची शारिरीक व शैक्षणिक पात्रता**
**पडताळणी करणे बाबत यादी प्रसिध्द करणे**
**बाबत**

**क्रमांक** कक्ष-४-३/आस्था/भरती-१६/१६-१७/ ५७९८
कोल्हापूर-३ दिनांक ३१ डिसेंबर २०१६

प्रति,
मुख्य परिचलन अधिकारी
मे.महाऑनलाईन लि.मुंबई

कोल्हापूर वनवृत्तामधील वनरक्षक भरती प्रक्रिया २०१६ चे अनुषंगाने ऑनलाईनव्दारे अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची शारिरीक क्षमता चाळणी चाचणी (पुरुष उमेदवार ५ कि.मी./महिला उमेदवार ३ कि.मी.अंतर अर्ध्या तासात पार करणे) दिनांक ५.११.२०१६ ते १४.११.२०१६ या कालावधीमध्ये घेण्यात आलेली आहे.

सदर चाळणी चाचणीमध्ये अर्ध्या तासामध्ये ज्या उमेदवारांनी विहीत अंतर पार केलेले आहे,अशा उमेदवारांची त्यांच्या धावण्याच्या वेळेनुसार सर्वसाधारण यादी तयार करण्यात आलेली असून (टप्पा क्रमांक तीन) सदरच्या यादीच्या अनुषंगाने अनुसुचित जाती,अनुसुचित जमाती,विजा(अ),भज(ब),इमाव,विमाप्र या समांतर आरक्षण प्रवर्गामध्ये रिक्त असलेल्या पदांचे अनुषंगाने तिसऱ्या टप्पा मधील सोबत जोडलेल्या यादीमधिल उमेदवारांनी त्यांची शारिरीक मोजमापे व कागदपत्रांचे पडताळणी कामी (Physical Measurement & Documents Verification) करीता **दिनांक ६.०१.२०१७ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता कोल्हापूर वन वृत्त कार्यालयामध्ये उपस्थित राहणे**करीता आपलेव्दारे उमेदवारांच्या भ्रमणध्वनीवर **SMS Alert तात्काळ** द्यावेत ही विनंती.

सोबतची यादी व सूचनासुध्दा आपले संकेतस्थळावर तात्काळ प्रसिध्दीस द्याव्यात ही विनंती.

सहपत्र:-सोबत यादी

सही/-
**(अे. एम. अंजनकर)**
**सदस्य सचिव,प्रादेशिक निवड समिती**
**तथा उपवनसंरक्षक,सातारा वन विभाग**

प्रतिलिपी:-उपवनसंरक्षक,कोल्हापूर वन विभाग यांना माहिती व आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी
२/- सदर भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने आवश्यक पूर्वतयारी तात्काळ करणेकामी.

# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय

" वनवर्धन ", प्रधान डाक घरासमोर, ताराबाई पार्क , कोल्हापूर - ४१६ ००३.

☎ कार्यालय-०२३१/२६५३६३२, निवास-२६५३६३४, फॅक्स-२६५९२३३ E-mail-ccftkolhapur@gmail.com


---

## वनरक्षक भरती प्रक्रिया २०१६

वनरक्षक भरती प्रक्रिया २०१६ चे अनुषंगाने खुल्या प्रवर्गातील व मागासवर्गीय तसेच समांतर आरक्षणामधील तात्पुरती यादी प्रसिध्द करुन या यादीमधिल उमेदवारांची प्रथम टप्प्यात व दुसऱ्या टप्प्यात शारिरीक मोजमापे व मूळ कागदपत्रे तपासणी अनुक्रमे दिनांक ६.१२.२०१६ व ७.१२.२०१६ व दुसऱ्या टप्प्यात दिनांक २६.१२.२०१६ रोजी समितीमार्फत करण्यात आलेली आहे.वनरक्षक भरती प्रक्रिया २०१६ चे अनुषंगाने अनुसुचित जाती,अनुसुचित जमाती,विजा(अ),भज(ब),इमाव,विमाप्र या समांतर आरक्षण प्रवर्गामध्ये रिक्त असलेल्या पदांचे अनुषंगाने तात्पुरती यादी (तिसरा टप्पा) www.kolhapurforest.co.in या संकेतस्थळावर दिनांक ३१.१२.२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.सदर यादीमधील उमेदवारांना त्यांची मूळ कागदपत्रे तपासणी व शारिरीक मोजमापे याकरीता **दिनांक ६.०१.२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता** बोलविण्यात आलेले आहे.त्या अनुषंगाने उमेदवारांना खालील प्रमाणे **सूचना** देण्यात येत आहेत.

१. तिसऱ्या टप्प्यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या यादीमधील उमेदवारांची शारिरीक मोजमापे व मूळ कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल.याकरिता उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये दावा केलेनुसार खालीलप्रमाणे मूळ कागदपत्रे सोबत आणावीत तसेच **सदरचे सर्व कागदपत्रांची एक साक्षांकित (Attested)प्रत सोबत आणावी.**

(१)जातीचे प्रमाणपत्र,उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र

(२)एस.एस.सी / एच.एस.सी गुणपत्रके व प्रमाणपत्रे,एका पेक्षा जास्त संधीमध्ये उत्तीर्ण असल्यास तद्सबंधीची सर्व गुणपत्रक

(३)ऑनलाईन अर्जाची छायाप्रत.

(४)प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त/भूकंपग्रस्त/अंशकालीन/खेळाडू/होमगार्ड/रोजंदारी वनमजूर इ.सबंधी सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र

(५)महिला उमेदवारांच्या बाबतीत जाहिरातीमध्ये नमूद केलेप्रमाणे सक्षम प्राधिकारी यांचेकडील नॉन क्रिमेलेयर प्रमाणपत्र.

(६)डोमिसाईल प्रमाणपत्र (महाराष्ट्र राज्याबाहेर वास्तव्य असलेल्या उमेदवारांना फक्त खुल्या प्रवर्गासाठीच विचार करण्यात येईल व खुल्या प्रवर्गासाठी लागू असलेले निकष राहतील)

(७)खेळाडू उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णय दिनांक १.०७.२०१६ मधील तरतूदीनुसार सबंधीत विभागीय उपसंचालक यांनी निर्गमित केलेले मूळ वैधता प्रमाणपत्र सोबत आणावे.याबंधीच्या सविस्तर सुचना www.kolhapurforest.co.in या संकेतस्थळावर यापूर्वीच प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

(८)माजी सैनिकांच्या बाबतीत Discharge certificate तसेच Army graduation चे प्रमाणपत्र सोबत आणावे.

(९)अंशकालीन उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयामध्ये नोंद असलेले प्रमाणपत्र सोबत आणावे.अन्यथा त्यांचा अंशकालीन या राखीव प्रवर्गासाठी विचार

करण्यात येणार नाही.
(१०)रोजंदारी वनमजूर याकरीता ऑनलाईन अर्जामध्ये दावा केलेल्या उमेदवारांनी त्यांना सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र सोबत आणावे.असे प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांचा रोजंदारी वनमजूर या राखीव प्रवर्गासाठी विचार करण्यात येणार नाही.
(११)होमगार्ड उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले मूळ प्रमाणपत्र सोबत आणावे.
(१२)शासन सेवेत असलेल्या उमेदवारांनी त्यांचे कार्यालय/विभाग प्रमुखांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करावे.
(१३)स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य असल्यास,तसे प्रमाणपत्र सादर करावे.

तिसऱ्या टप्प्यामधील तात्पुरत्या यादीमधील उमेदवारांची सर्वप्रथम नियुक्त समितीमार्फत शारिरीक मोजमापे घेण्यात येतील.यामध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच मूळ कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल.जे उमेदवार शारिरीक मोजमापे व मूळ कागदपत्रांचे तपासणीमध्ये पात्र ठरतील,त्या उमेदवारांचा समावेश अंतिम लघुयादीमध्ये करण्यात येईल.

दिनांक ६.०१.२०१७ रोजी तिसऱ्या टप्प्यामधील तात्पुरत्या यादीमधील उमेदवारांची शारिरीक मोजमापे व मूळ कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर यामध्ये अपात्र ठरलेले उमेदवारांचे संख्येइतके त्याच प्रवर्गामधील गुणवत्तेनुसार (धावण्याचे टायमिंग) उमेदवारांची पूरक यादी प्रसिध्द करण्यात येईल व त्यांना भरती प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची संधी देण्यात येईल.अशा पूरक यादीमधील उमेदवारांची पुन्हा शारिरीक मोजमापे व मूळ कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल व पुढील कार्यवाही पूर्ण केली जाईल.

**<u>शारिरीक मोजमापे व मूळ कागदपत्रे तपासणीचे ठिकाण</u>**

मुख्य वनसंरक्षक(प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय,
वनवर्धन बिल्डींग,हेड पोस्ट ऑफिससमोर,
ताराबाई पार्क,कोल्हापूर-४१६ ००३.

**(अे. एम. अंजनकर)**
**सदस्य सचिव,प्रादेशिक निवड समिती**
**तथा उपवनसंरक्षक सातारा वनविभाग**